# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

## M. A. भाग – १

## मराठी विषयाचा पुनर्रचित अभ्यासक्रम- जून २०१९ पासून

## Choice Based Credit System [CBCS]

निवड आधारित श्रेयांक पद्धत

SNJB's K.K.H.A.Arts, S.M.G.L.Com. & S.P.H.J. Science College
CHANDWAD (NASHIK)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
## मानवविज्ञान विद्याशाखा
## M. A. मराठी

जून २०१९ पासून निवड आधारित श्रेयांक पद्धतीच्या (Choice Based Credit System) [CBCS] एम. ए. मराठी विषयाच्या पुनर्रचित अभ्यासक्रमाची रचना :

| Semester | Core Courses (CC) | Choice Based Optional Paper | Total Credit |
|---|---|---|---|
| I | CC – 1 (4)<br>CC – 2 (4)<br>CC – 3 (4) | CBOP 4 (4) | 16 |
| II | CC – 5 (4)<br>CC – 6 (4)<br>CC – 7 (4) | CBOP 8 (4) | 16 |
| III | CC – 9 (4)<br>CC – 10 (4)<br>CC – 11 (4) | CBOP 12 (4) | 16 |
| IV | CC – 13 (4)<br>CC – 14 (4)<br>CC – 15 (4) | CBOP 16 (4) | 16 |
| | **48** | **16** | **64** |

| सत्र | Core Courses (CC) (मुख्य अभ्यासक्रम) | | Credit (श्रेयांक) | Choice Based Optional Paper (निवड आधारित वैकल्पिक) | | Credit (श्रेयांक) | Total Credit |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | CC - 1 | भाषाव्यवहार आणि भाषिक कौशल्ये - भाग १ | ४ | CBOP - 5 | ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य | ४ | १६ |
| | CC - 2 | अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास ( इ.स.१८१८ ते इ.स.१९२०) | ४ | | मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी ( प्रारंभ ते १८१८ ) | | |
| | CC - 3 | ऐतिहासिक भाषाविज्ञान | ४ | | तौलनिक साहित्याभ्यास - भाग १ | | |
| | | | | | वाङ्मयेतिहासलेखनविद्या - भाग १ | | |
| | | | | | मराठी व्याकरण - भाग १ | | |
| २ | CC - 5 | भाषाव्यवहार आणि भाषिक कौशल्ये - भाग २ | ४ | CBOP - 8 | ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य | ४ | १६ |
| | CC - 6 | अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ. स.१९२० ते इ. स. २०१०) | ४ | | मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (इ.स. १८१८ ते १९६०) | | |
| | CC - 7 | समाजभाषाविज्ञान | ४ | | तौलनिक साहित्याभ्यास भाग - २ | | |
| | | | | | वाङ्मयेतिहासलेखनविद्या -भाग २ | | |
| | | | | | मराठी व्याकरण - भाग २ | | |
| | | | २४ | | | ०८ | ३२ |

CHANDWAD (NASHIK)

| प्रश्नपत्रिका आराखडा | | |
|---|---|---|
| वेळ : ३ तास | सत्रांत परीक्षा | गुण : ५० |
| १ | दीर्घोत्तरी प्रश्न दोन पैकी एक | १० |
| २ | दीर्घोत्तरी प्रश्न दोन पैकी एक | १० |
| ३ | दीर्घोत्तरी प्रश्न दोन पैकी एक | १० |
| ४ | दीर्घोत्तरी प्रश्न दोन पैकी एक | १० |
| ५ | टिपा लिहा चार पैकी दोन | १० |
| | एकूण | ५० |
| | अंतर्गत मूल्यमापन | |
| १. | लेखी चाचणी / मध्यकालीन चाचणी (एक घ्यावी.) | १५ |
| २. | शोध निबंध | ५ |
| ३. | ग्रंथालयीन कार्य | ५ |
| ४. | सादरीकरण | ५ |
| ५. | लघु प्रश्नमंजुषा | ५ |
| ६. | गृहपाठ | ५ |
| ७. | विस्तार कार्य | १० |
| ८. | संशोधन प्रकल्प / खुले पुस्तक परीक्षा | १० |
| | अंतर्गत मूल्यमापनासाठी वरील पर्याय निवडावे. त्यांचे एकूण गुण पन्नास असावे. | ५० |

SNJB's K.K.H.A Arts, S.M.G.L.Com. & S.P.H.J Science College
CHANDWAD (NASHIK)

# M. A. मराठी विषयाचा पुनर्रचित अभ्यासक्रम- जून २०१९ पासून

१. Title of the course: M. A. (मराठी)

२. Preamble of the syllabus: पदव्युत्तर शिक्षणासाठी, M. A. मराठीसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याने पदवीस्तरावरील अभ्यासक्रम विशेषस्तरावर पूर्ण केला आहे. अशा विद्यार्थ्यांना पदव्युत्तर स्तरावर मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे खालीलप्रकारची ठेवण्यात आली आहे.

हा अभ्यासक्रम तयार करीत असताना काही आधारभूत तत्त्वे स्वीकारली आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे प्रत्यक्षात आणताना, विद्यार्थी केंद्री, आंतर्विद्याशाखीय, रोजगाराभिमुख, कौशल्याधिष्ठीत असे भाषा व साहित्याचे अभ्यासक्रम अनुसरणे, निर्माण करणे आवश्यक आहे. तसेच जीवन कौशल्य विकासासाठी भाषा, साहित्य, कला ही माध्यमे अधिक परिणामकारकतेने समजावून घेणे आवश्यक झाले आहे. याचबरोब साहित्यिकक्षमता, भाषिकक्षमता वाढीसाठी, जीवनाच्या आकलनासाठी आणि प्रगल्भतेसाठी विद्यार्थी सिद्ध करणे; ही आजची गरज बनली आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे सखोल ज्ञान व्हावे. संशोधनाची वृत्ती वाढावी, आंतर्विद्याशाखीय ज्ञान व्हावे; असे अनेक हेतू समोर ठेऊन M.A.मराठीचा अभ्यासक्रम तयार केला आहे. अशा या अभ्यासक्रमासाठी काही उद्दिष्टे ठेवली आहेत.

१. पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांच्या वाङ्मयीन आणि जीवनविषयक जाणिवा समृद्ध करणे.
२. साहित्यकृतींच्या चिकित्सक अभ्यासाची प्रवृत्ती वृद्धिंगत करणे.
३. भाषिक जाणिवा विकसित करून कौशल्यात्मक उपयोजनासाठी सिद्ध करणे.
४. विविध जीवनक्षेत्रातील भाषाविषयक कौशल्य ग्रहणानंतर रोजगारक्षमतांची आणि प्रावीण्यांची निर्मिती करणे.
५. वाङ्मयीनमूल्यांचे आणि जीवनमूल्यांचे संस्कार करणे.
६. विशिष्ट कालखंडातील साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा व प्रवृत्ती लक्षात घेऊन साहित्याचे नेमके आकलन करणे.
७. लेखकाच्या समग्र अभ्यासातून लेखकाच्या साहित्यकृती, आशयसूत्रे, भाषिक प्रयोग, जीवनदृष्टी इत्यादींचे वाङ्मयीन प्रवाहातील मूल्यमापन व स्थान निर्धारण करणे.
८. तौलनिक अभ्यास, भाषांतर मीमांसा, प्रभाव अभ्यास, आंतर्विद्याशाखीय दृष्टी, परभाषेतील समकालीन साहित्यकृती, वाङ्मयेतिहास, संस्कृती अभ्यास, भाषिक अभ्यास याद्वारे साहित्याच्या अभ्यासाला परिपूर्णता आणून देण्याचा प्रयत्न करणे.
९. पौर्वात्य व पाश्चात्त्य साहित्यविचार, साहित्यसिद्धांत, समीक्षा, साहित्यविमर्श, विविध वाङ्मयीन संप्रदाय, वेळोवेळी उद्भवणाऱ्या जीवनविषयक व वाङ्मयीन चर्चा, संकल्पना यांचा पैस विद्यार्थ्यांना परिचित होणे.
१०. वाचन, आस्वादन, विश्लेषण, वर्गीकरण, मूल्यनिर्णयन या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांची वाङ्मय आकलनाची क्षमता वृद्धिंगत करणे .
११. साहित्य कला व इतर कला यांच्या वाचनातून अभिरुची वृद्धिंगत करणे .

CHANDWAD (NASHIK)

१२. साहित्य आणि संस्कृती यांचा परस्पराश्रयी संबंध जागतिक परिप्रेक्ष्यात लक्षात घेण्याची क्षमता व कौशल्ये निर्माण करणे.

M.A.मराठी विषयाचा अभ्यासक्रमाची पुनर्रचना खालील क्रमाने करण्यात येणार आहे.

१. First Year M.A.2019-20.

२. Second Year M.A.2020-21.

M.A. मराठी हा पुनर्रचित अभ्यासक्रम दोन वर्षांचा आणि चार सत्रांत विभागलेला निवड आधारित श्रेयांक पद्धतीचा (Choice Based Credit System) [CBCS] आहे. हा अभ्यासक्रम प्रथम M.A. भाग १ (सत्र १ आणि सत्र २), M.A. (सत्र ३ आणि सत्र ४) अशा ६४ श्रेयांकांचा आहे.

३. Introduction : Pattern: निवड आधारित श्रेयांक पद्धत (Choice Based Credit System) [CBCS]

४. Eligibility: कोणत्याही विद्याशाखेतील पदवी. (SPPU Circular No. 100 of 2017, p.55)

५. Examination:

१. Pattern of examination:

१. Semester

२. Pattern of the question paper:

| | |
|---|---|
| विद्यापीठ सत्र परीक्षा | ५० गुण |
| अंतर्गत मूल्यमापन | ५० गुण |
| एकूण | १०० गुण |

२. Standard of passing: उत्तीर्ण होण्यासाठी विद्यापीठ सत्र परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापनामध्ये ५० पैकी २० गुण अनिवार्य.

३. Award of class:

**1.Percentage to Grades and Grade Points**

The following formula may be used to convert marks (%) into letter grades.

Let $\bar{X}$ = mean of % age marks of all student appeared in the paper

$\sigma$ = Standard deviation

m = % of marks obtained

| Letter grade | Numerical grade | Formula |
|---|---|---|
| O (outstanding) | 10 | $m \geq \bar{X} + 2.5\sigma$ |
| A+ (Excellent) | 9 | $\bar{X} + 2.0\sigma \leq m < \bar{X} + 2.5\sigma$ |
| A (Very Good) | 8 | $\bar{X} + 1.5\sigma \leq m < \bar{X} + 2.0\sigma$ |
| B+ (Good) | 7 | $\bar{X} + 1.0\sigma \leq m < \bar{X} + 1.5\sigma$ |
| B (Above average) | 6 | $\bar{X} \leq m < \bar{X} + \sigma$ |
| C (Average) | 5 | $\bar{X} - 0.5\sigma \leq m < \bar{X}$ |
| D (Pass) | 4 | $\bar{X} - \sigma \leq m < \bar{X} - 0.5\sigma$ |
| F (Fail) | 0 | $m < \bar{X} - \sigma$ |
| Ab (Absent) | 0 | |

* Minor variations may be adjusted by the individual institution.

S.N.J.B's K.K.H.A.Arts, S.M.G.L.Com. & S.P.H.J. Science College CHANDWAD (NASHIK)

४. Setting of Question paper / Pattern of Question paper :

| प्रश्नपत्रिका आराखडा | | |
|---|---|---|
| वेळ : ३ तास | सत्रांत परीक्षा | गुण : ५० |
| १ | दीर्घोत्तरी प्रश्न दोन पैकी एक | १० |
| २ | दीर्घोत्तरी प्रश्न दोन पैकी एक | १० |
| ३ | दीर्घोत्तरी प्रश्न दोन पैकी एक | १० |
| ४ | दीर्घोत्तरी प्रश्न दोन पैकी एक | १० |
| ५ | टिपा लिहा चार पैकी दोन | १० |
| | एकूण | ५० |
| | अंतर्गत मूल्यमापन | |
| १. | लेखी चाचणी / मध्यकालीन चाचणी (एक घ्यावी.) | १५ |
| २. | शोध निबंध | ५ |
| ३. | ग्रंथालयीन कार्य | ५ |
| ४. | सादरीकरण | ५ |
| ५. | लघु प्रश्नमंजुषा | ५ |
| ६. | गृहपाठ | ५ |
| ७. | विस्तार कार्य | १० |
| ८. | संशोधन प्रकल्प / खुले पुस्तक परीक्षा | १० |
| | अंतर्गत मूल्यमापनासाठी वरील पर्याय निवडावे. त्यांचे एकूण गुण पन्नास असावे. | ५० |

५. Structure of Course:

| Semester | Core Courses (CC) | Choice Based Optional Paper | Total Credit |
|---|---|---|---|
| I | CC – 1 (4)<br>CC – 2 (4)<br>CC – 3 (4) | CBOP 4 (4) | 16 |
| II | CC – 5 (4)<br>CC – 6 (4)<br>CC – 7 (4) | CBOP 8 (4) | 16 |
| III | CC – 9 (4)<br>CC – 10 (4)<br>CC – 11 (4) | CBOP 12 (4) | 16 |
| IV | CC – 13 (4)<br>CC – 14 (4)<br>CC – 15 (4) | CBOP 16 (4) | 16 |
| | **48** | **16** | **64** |

S.N.J.B.'s K.K.H.A. Arts, S.M.G.L. Com. & S.P.H.J. Science College
CHANDWAD (NASHIK)

६. Work Load:

१. श्रेयांक तास १५ :

२. १ तास मिनिट ६० :

३. १ सत्र :४ श्रेयांक

७. Subject wise Detail Syllabus & Recommended books:

**M.A. मराठी – भाग १**

निवड आधारित श्रेयांक पद्धत (Choice Based Credit System) जून २०१९ पासून

**विषयाचे नाव : भाषाव्यवहार आणि भाषिक कौशल्ये भाग १ (CC-1)**

## पहिले सत्र

**घटक १. मराठीच्या प्रमाणभाषेचे लेखन व मुद्रितशोधन**

१.१ प्रमाणभाषा : संकल्पना, स्वरूप आणि आवश्यकता
१.२ प्रमाणभाषाविषयक लेखननियम : परिचय
१.३ प्रमाणभाषाविषयक लेखननियमांचे उपयोजन ( उताऱ्याचे लेखननियमांनुसार लेखन )
१.४ मुद्रितशोधन : संकल्पना, स्वरूप आणि आवश्यकता
१.५ मुद्रितशोधनाच्या खुणा, चिन्हे
१.६ मुद्रितशोधन : उपयोजन ( उताऱ्याचे मुद्रित शोधन )

**१५ तास १ श्रेयांक**

**घटक २. वाङ्मयीन व्यवहार व प्रकाशन व्यवसाय**

२.१ विविध साहित्यसंस्था व त्यांचे वाड्.मयीन कार्य
२.२ साहित्यसंस्था व त्यांची मुखपत्रे
२.३. साहित्यसंस्थांकडून आयोजित केली जाणारी साहित्यसंमेलने
२.४ वाड्.मयीन नियतकालिके व अनियतकालिके,
२.५ दिवाळी अंक, विशेषांक, स्मरणिका इ. चे संपादन. मांडणी, जाहिरात आणि ISSN विषयक माहिती
२.६ प्रकाशन व्यवसाय, प्रकाशन संस्था, पुस्तक प्रकाशन
२.७ ग्रंथ संहिता निवड, ग्रंथमांडणी व सजावट, मुखपृष्ठ, मलपृष्ठ, बांधणी, जाहिरात, वितरण आणि ISBN विषयक माहिती.

**१५ तास १ श्रेयांक**

**घटक 3. मुलाखत : स्वरूप, तंत्र व कौशल्ये**

३.१ मुलाखतीचे प्रयोजन व स्वरूप
३.२ मुलाखतीचे प्रकार
३.३ मुलाखतीची पूर्वतयारी

S.M.G.L.Com. & S.P.H.J. Science College, K.K.H.A.Arts, CHANDWAD (NASHIK)

३.४ मुलाखतीसाठीची प्रश्नसूची

३.५ माध्यमनिहाय मुलाखती

३.६ प्रासंगिक मुलाखती

३.७ मुलाखत लेखन

**१५ तास १ श्रेयांक**

**घटक ४. अर्जलेखन व पत्रलेखन**

४.१ अर्जाचे स्वरूप व प्रकार

४.२ पत्रलेखनाचे विविध प्रकार

४.३ संगणकीय पत्रव्यवहाराचे तंत्र

४.४ प्रशासनिक पत्रव्यवहार

४.५ प्रशासनिक परिभाषा

**१५ तास १ श्रेयांक**

## दुसरे सत्र

### विषयाचे नाव : भाषाव्यवहार आणि भाषिक कौशल्ये भाग-२ (CC-5)

**घटक १. भाषांतर व अनुवाद लेखन**

१.१ भाषांतराचे स्वरूप

१.२ भाषांतराची आवश्यकता व महत्त्व

१.३ भाषांतराचे विविध प्रकार

१.४ भाषांतर, अनुवाद, भावानुवाद आणि रूपांतर यातील साम्य-भेद

१.५ इंग्लिश उताऱ्याचे मराठीत भाषांतर करणे

१.६ हिंदी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करणे.

**१५ तास १ श्रेयांक**

**घटक २ निवेदन कौशल्ये**

२.१ निवेदनाची आवश्यकता व स्वरूप

२.२ निवेदनाची तंत्रे, निवेदनाची शैली

२.३ विविध कार्यक्रमांचे नियोजन-आयोजन

२.४ विविध कार्यक्रमांचे निवेदन आणि सूत्रसंचालन ( सांस्कृतिक कार्यक्रम, जाहीर कार्यक्रम आकाशवाणी व दूरदर्शनवरील कार्यक्रम)

२.५ प्रभावी निवेदनाचे गुणविशेष

**१५ तास १ श्रेयांक**

**घटक ३ जनसंपर्क : संकल्पना व स्वरूप**

३.१ जनसंपर्काचे स्वरूप व आवश्यकता

३.२ जनसंपर्क कौशल्याची तंत्रे, जनसंपर्क कौशल्याची भाषा

३.३ माहिती व जनसंपर्क अधिकारी

३.४ शासन, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, बँका, कंपन्यांसाठी जनसंपर्काचे महत्त्व व आवश्यकता

**१५ तास १ श्रेयांक**

SNJB's K.K.H.A. SMGL Com. & SPHJ Sc. College (NASHIK)

घटक ४ प्रकल्पलेखन : स्वरूपचर्चा

४.१ वाङ्मयीन प्रकल्पलेखनाचे स्वरूप

४.२ प्रकल्पलेखनातील घटक

४.३ प्रकल्पलेखनाची भाषा

४.४ प्रकल्पलेखनातील संदर्भ नोंदी

४.५ प्रत्यक्ष प्रकल्पलेखन (प्रकल्पलेखनास १० गुण असतील)

४.६ प्रकल्पलेखनासाठी काही विषयक्षेत्रे (नमुना सूची )

आकाशवाणीवरील प्रमुख कार्यक्रम, दूरचित्रवाणीचे सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य. आकाशवाणी / दूरचित्रवाणी / नियतकालिकासाठी प्रत्यक्ष मुलाखत घेणे, शैक्षणिक सहल आयोजित करणे, प्रसारमाध्यमांचे कार्यालय, प्रकाशन संस्था यांना भेटी देणे, लेखनातील संगणकाचा वापर इत्यादी.

**१५ तास १ श्रेयांक**

## संदर्भ ग्रंथ


| | |
|---|---|
| १. व्यावहारिक मराठी | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| २. व्यावहारिक मराठी | डॉ.कल्याण काळे, डॉ.दत्तात्रय पुंडे |
| ३. व्यावहारिक मराठी | संपादक डॉ .स्नेहल तावरे |
| ४. व्यावहारिक मराठी | डॉ. लीला गोविलकर, डॉ.जयश्री पाटणकर |
| ५. व्यावहारिक मराठी | डॉ. सयाजीराजे मोकाशी, प्रा. रंजना नेमाडे, |
| ६. व्यावहारिक मराठी | ल. रा. नसिराबादकर |
| ७. व्यावहारिक मराठी विशेषांक | नवभारत ,ऑ.-सप्टेंबर १९८२, प्राज्ञ पाठशाळा, वाई |
| ८. मराठी शुद्धलेखन प्रदीप | मो.रा.वाळंबे, जुनी आवृत्ती, नितीन प्रकाशन, पुणे-३० |
| ९. मराठी शुद्धलेखन प्रदीप | मो.रा.वाळंबे, संपा. अरुण फडके,पुणे-३० |
| १०.मराठी लेखन मार्गदर्शिका | राज्य मराठी विकास संस्था ,यास्मिन शेख |
| ११.मराठी शब्दलेखनकोश | यास्मिन शेख, हर्मीस प्रकाशन, पुणे. |
| १२.पॉप्युलर रीतिपुस्तक | रामदास भटकळ, मृदुला जोशी, पॉप्युलर प्रकाशन |
| १३.शुद्धलेखन विवेक | डॉ. द.न.गोखले,सोहम प्रकाशन, पुणे-३० |
| १४.भाषांतरमीमांसा | डॉ अंजली सोमण.डॉ ,कल्याण काळे . |
| १५.भाषांतर | सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मयगृह, मुंबई. |
| १६.भाषांतर शास्त्र की कला | म. वि. फाटक, रजनी ठकार, वरदा प्रकाशन |
| १७.भाषांतर आणि भाषा | विलास सारंग, मौज प्रकाशन |
| १८.अनुवादमीमांसा | संपादक केशव तुपे, साक्षात, औरंगाबाद |
| १९. मराठी भाषेची संवाद कौशल्ये | य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक;पुस्तक क्र.१ते ८ |
| २०. प्रसार माध्यमांसाठी लेखनकौशल्ये | य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक |
| २१. संपादन: स्वरूप व कौशल्ये )MCJ-305) | य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक |
| २२. प्रशासनिक मराठी भाषेचा विकास | गीता भागवत,राज्य मराठी विकास संस्था,प्रशासन, मुंबई |
| २३. मुद्रित शोधन | वाय.ए.धायगुडे,दि.पूना प्रेस ओनर्स असोसिएशन |
| २४. मराठी लेखनकोश | अरुण फडके,ढवळे प्रकाशन, मुंबई |


PRINCIPAL
K.K.H.A. Arts, S.M.G.L. Comm.
& S.P.H.J. Science College,
Chandwad Dist. Nashik.

| | |
|---|---|
| २५. भाषांतर मीमांसा | संपा.डॉ.कल्याण काळे,डॉ. अंजली सोमण |
| २६. भाषा: स्वरूप, सामर्थ्य व सौंदर्य | डॉ. वा. के. लेले,राजहंस प्रकाशन, पुणे-३० |
| २७. अनुवाद: स्वरूप और विवेचन | य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक |
| २८. साहित्य संवाद | प्रा.वि.शं.चौघुले,प्रतिमा प्रकाशन, पुणे-३० |
| २९. संवाद शास्त्र | श्रीपाद जोशी,संभव प्रकाशन, नागपूर |
| ३०. माध्यम चित्रवाणी | आकाशानंद,ग्रंथकार प्रकाशन, मुंबई |
| ३१. सुगम मराठी व्याकरण लेखन | मो.रा.वाळंबे,नितीन प्रकाशन, पुणे |
| ३२. महाराष्ट्र साहित्य पत्रिका (साहित्यसंस्था विशेषांक) | एप्रिल-मे-जून१९८६ अंक २३७ |
| ३३.महाराष्ट्र साहित्य पत्रिका | शताब्दी महोत्सव १९०६-२००६,एप्रिल-सप्टेंबर २००६, अंक ३१७,३१८. |
| ३४.महाराष्ट्र साहित्य पत्रिका | एप्रिल-मे-जून २००५ |
| ३५. माहितीमय समाजाचे समाजशास्त्र | य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक |
| ३६. मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास | डॉ.उषा मा. देशमुख,अभ्यासखंड १ ते ३., पुणे. |
| ३७. साहित्याची भूमी | श्री.पु.भागवत,ग्रंथाली प्रकाशन,दादर,मुंबई- २८ |
| ३८. भाषा : अंत:सूत्र आणि व्यवहार | संपा.मु.ग.पानसे |
| ३९. भाषांतर विद्या: स्वरूप आणि समस्या | डॉ. रमेश वरखेडे. |
| ४०.भाषा: मातृभाषा आणि परभाषा | रा.सो. सराफ |
| ४१. संमेलनस्मृती | संपा. डॉ. व्ही .बी. गायकवाड, डॉ.बाळासाहेब गुंजाळ, डॉ. वेदश्री थिगळे, डॉकिरण चव्हाण .डॉ, दिलीप पवार. |
| ४२.शासन व्यवहारात मराठी भाषा | संचालनालय, महाराष्ट्र शासन |
| ४३.महाराष्ट्र साहित्य परिषद | म. श्री.दीक्षित,राज्य मराठी विकास संस्था, मुंबई |
| ४४. साहित्याची भाषा | डॉ. भालचंद्र नेमाडे |
| ४५. साहित्य संमेलनाचे महाभारत | डॉ. भीमराव कुलकर्णी,सुपर्ण प्रकाशन, पुणे |
| ४६.शतकाची विचारशैली : खंड १३,२, | डॉ.रमेश धोंगडे,दिलीपराज प्रकाशन, पुणे |
| ४७. संवाद | संपा. अरुण शेवते,मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनई |
| ४८.दलितांची नियतकालिके | हरिश्चंद्र निर्मळे,सुगावा प्रकाशन, पुणे |
| ४९.मराठी साहित्य काही लेखनबंध | डॉ.सुधाकर शेलार |
| ५०.व्यासपीठ | डॉ. महादेव वाळुंज |
| ५१.व्यावहारिक, उपयोजित मराठी आणि प्रसारमाध्यमांची कार्यशैली | डॉ. संदीप सांगळे |


ARTS & LODHA COM. JAIN SCIENCE COLLEGE CHANDWAD (NASHIK)

श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल) संचलित

कर्मवीर केह आवड कला, श्रीमान सो.गी. भोग वाणिज्य आणि श्रीमान पी.एच. जैन विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय चांदवड, जि. नाशिक

मराठी विभाग (पदव्युत्तर) - २०१९

एम. ए. मराठी - भाग II
सेमिस्टर - III

विद्यार्थ्याचे नाव - शिंदे आरती बाबासाहेब

श्रेयांक पद्धत विश्लेषण तक्ता

| घटक | घटकाचे नाव | गुण. |
|---|---|---|
| १ | लेखी परिक्षा | १५/२० |
| २ | चर्चासत्र / सादरीकरण | १०/१० |
| ३ | स्कुले पुस्तक परिक्षण | ०८/१० |
| ४ | लघुशोध निबंध प्रकल्प | ०६/१० |
| ५ | गटचर्चा | ०५/१४ |

घटक - १

# लेखी परिक्षा

Total Pages - 8

S.N.J.B. Ashram's,

**KAR. K. H. ABAD ARTS, SHRIMAN M. G. LODHA COMMERCE & SHRIMAN P.H. JAIN SCIENCE COLLEGE,**

Neminagar, Chandwad Dist. Nashik

Jr. Supervisor's Signature & Date :

ALJCC 445

Name: शिंदे आरती रावसाहेब

Day & Date :

Seat No. (in figures)

Seat No. (in words)

Class : एम.ए. मराठी पार्ट - II Sem-III

Examination : भित्तीं परिक्षा

Subject : प्रसारमाध्यमे आणि साहित्य व्यवहार

| Question No. | Marks |
|---|---|
| 1 | |
| 2 | |
| 3 | |
| 4 | |
| 5 | |
| TOTAL | |

No. of Suppliment :

| Main | Supplement | Total |
|---|---|---|
| 1 | + | = |

Examiner's Signature

(Please start writing here. Write on both sides)

प्रश्न : दृक-श्राव्य माध्यमांचे स्वरुप व वैशिष्टे स्पष्ट करा.

⇒ प्रास्ताविक -

आधुनिक युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे आज जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही कोणतीही घटना जशी घडली तशी आपल्यापर्यंत आणण्याचे कार्य प्रसार-माध्यमे करत असतात. त्यामुळे प्रसारमाध्यमास महत्व येउ लागले आहे. अशाया प्रसारमाध्यमांचे दोन भागात वर्गीकरण केले जाते.

मुद्रित माध्यमात वेगवेगळ्या बातम्या लेख संपादकीय ... इत्यादी छायाचित्रांसह छपाई केली जाते व ते ग्राहकांना वाचकांना सकाळी नियमितपणे सशुल्क उपलब्ध करुन दिले जाते. पण दृक-श्राव्य माध्यमांचे स्वरुप याहुन स्वरुपच भिन्न आहे. दृक श्राव्यात टेक्नो. पालटो अपेक्षित आहे, तो मजकुर प्रसारित केला जातो. तो प्रेक्षकांपर्यंत सविनय सादर होत असतो. त्यामुळे प्रेक्षकांच्या कानाला आणि डोळ्यांना एकाच वेळी चालना मिळते. म्हणुनच मुद्रित माध्यमांपेक्षा दृक-श्राव्य माध्यम अधिक प्रभावी माध्यम म्हणुन ओळखले जाते. मानवी संस्कृतीच्या विकासात मुद्रित माध्यमांनी महत्वाचे योगदान दिले

ही उणिव दृक-श्राव्य माध्यमांनी भरुन काढली. त्यामुळे काही गोष्टी लवकर समजण्यास मदत झाली. दृक-श्राव्य माध्यमांचे महत्व वाढु लागले यासाठी दृक-श्राव्य ही संकल्पना समजुन घेणे गरजेचे आहे

अ) दृक-श्राव्य संकल्पना :-

दृक - दृक म्हणजे पाहणे व श्राव्य म्हणजे ऐकणे यावरुन 'दृक-श्राव्य' हा शब्द बनला. काही प्रसारमाध्यमे केवळ श्राव्य आहेत, उदा. आकाशवाणी तर काही प्रसारमाध्यमे दृक-श्राव्य या दोन्ही गोष्टी एकाच वेळी साध्य करु शकतात. उदा. दुरदर्शन, इंटरनेट ही दोन्ही माध्यमे लोकांच्या दैनंदीन जीवनाचा अविभाज्य घटक बनली. त्यांना जन माध्यमे असे रुप मिळाले

एकंदरीत दृक-श्राव्य माध्यमामध्ये दुरदर्शन व इंटरनेटचा समावेश होतो

स्वरुप व वैशिष्टे :-

१) दृक-श्राव्य माध्यम :-

आकाशवाणी हे श्राव्य माध्यम आहे. हे आपण या अगोदर पाहिलेच आहे. त्यामुळे आकाशवाणी आणि तिचे स्वरुप पाहिले आहे; परंतु आकाशवाणीसारखे दुरदर्शन हेही एक माहिती पुरविणारे मनोरंजन करणारे माध्यम आहे. आकाशवाणी आणि दुरदर्शन आपण एकाच वेळी ऐकुही शकतो आणि पाहुही शकतो. अशी त्याची रचनापद्धती असते आकाशवाणी फक्त ऐकु शकतो आणि ऐकुनच तो कार्यक्रम आणि तिची घडण यांची कल्पनेनेच आराखडा तयार करु शकतो. पण दुरदर्शनवरील सर्व कार्यक्रम आपण पाहु शकतो. आणि त्याचबरोबर ऐकुही शकतो यामुळे दुरदर्शन हे एक ऐकणारे आणि पाहणारे असे दोन्ही काम एकदाच पार

आकाशवाणी हे ध्वनीवर आधारलेले माध्यम आहे. ध्वनीच्या आधारे आपण आकाशवाणीवरील सर्व कार्यक्रमाचा आस्वाद घेतो. परंतु दुरदर्शन हेही ध्वनींच्या आधारेच कार्यक्रम सादर करीत असते. फक्त त्या ध्वनीबरोबरच प्रकाशयोजना योग्यरित्या केली जाते. दुरदर्शन हे दृक-श्राव्य माध्यम असल्यामुळे योग्य प्रकाश योजना केली की कोणत्याही कार्यक्रमात रंगत आणखी वाढते. आकाशवाणीवर मात्र तसेच काहीच करता येत नाही. योग्य प्रकाश योजना आणि ध्वनींचाही योग्य वापर यांच्या संयोगाने दुरदर्शन आणि त्यांच्यावरील सर्व कार्यक्रम अतिशय शुद्ध असतात.

३) घटना-प्रसंगांचे थेट प्रक्षेपण :-

विविध कार्यक्रमाचे आणि घटनांचे थेट प्रक्षेपणात फरक जाणवतो. घटना-प्रसंग कोणताही असला तरी त्याचे थेट प्रक्षेपण आकाशवाणीवरही असते. आणि दुरदर्शनवरही असते. सदरहु प्रसंग किंवा घटना अशी घडलेली आहे. त्याचे वर्णन हे दोन्हीही माध्यमांत येते पण दुरदर्शनच्या माध्यमात येणाऱ्या वर्णनात फरक असतो. दुरदर्शन हे चित्र प्रत्यक्ष दाखविते आणि त्यामुळे घडलेल्या घटनेचे सर्व संदर्भ समजतात. प्रत्यक्ष घटना कशी झाली आहे किंवा कशामुळे झाली आहे किती नुकसान झाले आहे हे प्रत्यक्ष डोळ्यांनीच पाहता येते आकाशवाणीवर हे सर्व ऐकले तर पाहण्याचा आनंद काहीतरी वेगळाच असतो. दुरदर्शन मात्र एखाद्या घटना-प्रसंगाचे थेट प्रक्षेपण करुन ती घटना आता कशी आहे हे दाखवितात.

४) श्रोता-प्रेक्षक भूमिका :

आकाशवाणी हे श्राव्य-माध्यम आहे. आकाशवाणी ऐकताना आपण फक्त श्रोत्यांची भूमिका पार पाडतो. परंतु दुरदर्शन हा श्रोता-प्रेक्षक यांच्या दोन्हीही भूमिका पार पाडायला लावणारे माध्यम आहे. दुरदर्शनवरचा कोणताही कार्यक्रम श्रोता, प्रेक्षक यांच भूमिकेतून पाहिला जातो. कोणताही

...तांना घडतात.

५) कॅमेऱ्याचा वापर :-

दूरदर्शनवर दिसणारी प्रत्येक घटना किंवा कोणताही कार्यक्रम हा कॅमेऱ्याद्वारे चित्रित केलेला असतो. त्यामुळे ती घटना किंवा तो कार्यक्रम आपल्यापर्यंत पोहोचत असतो. कॅमेरा, कॅमेराचे स्थान किंवा कॅमेऱ्याची हालचाल यांना विशेष महत्व असते. कोणत्या प्रसंगी कॅमेरा कसा वापरायचा याचे एक विशिष्ट तंत्र असते. दूरदृश्य, मध्यदृश्य किंवा समीपदृश्य तसेच अतिसमिपदृश्याचे चित्रिकरण कॅमेरा करत असतो. त्यामुळे कॅमेऱ्याला विशेष महत्व असते.

समारोप :-

आकाशवाणी, दूरदर्शन यापैकी आकाशवाणी हे श्राव्य आणि दूरदर्शन हे दृक-श्राव्य माध्यम आहे हे आपण पाहिले आणि त्या त्या माध्यमांची स्वरुप वैशिष्टे पाहिली प्रामुख्याने आकाशवाणीपेक्षा दूरदर्शनमधील घटनांचे थेट प्रक्षेपण पाहून एखादी घटना कशी झाली याच्याविषयी समजते पण आकाशवाणीद्वारे हे समजणे थोडे अवघड आहे. आकाशवाणी ही घटना कशी झाली हे सांगते पण श्राव्य स्वरुपात दूरदर्शनवर प्रत्यक्ष घटनाच दाखविली जाते हा आकाशवाणी आणि दूरदर्शनमधील महत्वाचा फरक आहे.

—— xox —— xox —— xox ——

Nominagar, Chandwad Dist. Nashik

Seat No. (in figures) ______ Jr. Supervisor's Signature & Date

Seat No. (in words) ______

Class TY मराठी - भाग - II Sem - III Division ______ No.: 14834

Subject प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार Paper लेखी परिक्षा - २ Supplement No. ______

(Please start writing here. Write on both sides)

प्रश्न. भाषेचे स्वरुप व वैशिष्टे सांगुन भाषेची वाटचाल स्पष्ट करा.

⇒ प्रास्ताविक.

भाषेविषयीचे कुतुहल प्राचीन काळापासुन माणसाला वाटत आले आहे. अगदी पुर्वीपासुनच लोकपरंपरेत भाषेच्या उगमाबद्दल, शक्तीबद्दल विविध आख्यायिका, कहाण्या प्रचलित होत्या, तो त्या कुतुहलाच्याच पुर्तीचा प्रयत्न होय. भाषा हे आपल्या अंतर्मनातील मनोगत, भावना, विचार इत्यादि प्रगट करण्याचे साधन आहे ही जाणिव तर पुर्वीपासुनच होती. पण या साधनाचे स्वरुप नेमके कसे आहे हे स्पष्ट करण्याचे प्रयत्न आधुनिक कालखंडात विशेषत्वाने होउ लागले त्यातुनच भाषाविज्ञान ही ज्ञानशाखाही विकसित होत गेली. बदलत्या कालानुसार भाषेत बदल होत गेल्याचे आपणास दिसुन येते. वेगवेगळ्या जाती-धर्माची भाषा वेगवेगळी असु शकते.

थोडक्यात भाषा हे अभिव्यक्तीचे साधन आहे व्याख्येचा विचार करताना 'मानवी मुखयंत्रातुन निर्माण झालेली ध्वनी चिन्हांनीयुक्त असलेली यादृच्छिक संकेतव्यवस्था म्हणजेच भाषा होय.'

* भाषेचे स्वरुप.

वरिल व्याख्येनुसार भाषा हे संकेतव्यवस्था असते असे आपण पाहिले. याचा अर्थ आशय व्यक्त करण्यासाठी भाषेमध्ये काही ठराविक रुणा वापरल्या जातात. जेव्हा भाषावैज्ञानिकांनी मानवी भाषांचा विचार केला. तेव्हा त्यांना या खुणा प्रामुख्याने ध्वनी-स्वनांच्या स्वरुपात आढळल्या. त्या ध्वनींच्या ...

जळे. तर त्याच्या रचना करूनच अर्थ व्यक्त होत असतो. याचे कारण असे की माणूस व्यावहारिकदृष्ट्या वेगळे ओळखू येणारे किती ध्वनी उपयोगात आणू शकतो याला मर्यादा आहेत. त्याला व्यक्त करावयाचे अर्थ मात्र अमर्याद आहेत. त्यामुळे मोजक्या ध्वनींच्या अनेक रचना करण्याचे तंत्र मानवी भाषेने विकसित केले असे म्हणता येईल. तसेच रेडिओ किंवा दुरदर्शनचा संच बाहेरून बघितला तर खूप सुबक आणि आकर्षक तारेच्या दिसतो पण मागच्या बाजूने उघडला तर त्यात वेगवेगळ्या स्वरूपच गुंतागुंतीच्या रचना केलेल्या आहेत असे दिसते.

भाषेचे स्वरूप असेच गुंतागुंतीचे असते. प्रत्येकाला स्वतःची भाषा येत असल्याने ती खूप सोपी असे वाटत असते. पण कोणत्याही भाषेचे स्वरूप आपण समजून घ्यायला लागलो की तिच्यात दुरदर्शन संचा-प्रमाणे स्वरूपच गुंतागुंतीच्या रचना आहेत लक्षात येते

## * भाषेची वैशिष्ट्ये :

भाषेच्या भिन्न पातळ्यांची एककांतील गुंफण व असंख्य वाक्ये निर्माण करण्यासाठी मानवी क्षमता ही मानवी भाषेची दोन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. मानवी भाषेची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

१) भाषेतील एखादा शब्द व त्याचा अर्थ हा केवळ योगायोग आहे. काळाच्या ओघात शब्दांचे अर्थ बदललेले जाऊ शकतात. शब्द व त्याचा अर्थ हा केवळ भाषेतील अपघात असतो. एखादा शब्द व त्याचा ठराविक अर्थ असा संबंध नैसर्गिक आजिबात नसतो.

२) एखाद्या भाषेतील असंख्य वाक्ये निर्माण करण्याची मानवी क्षमता हा माणसाला मिळालेल्या नैसर्गिक देणगीचा भाग आहे. उदा. उभयान्वयी अव्ययाच्या साहाय्याने एका वाक्याला दुसरे वाक्य दुसऱ्या वाक्याला तिसरे वाक्य जोडले जाऊन असंख्य वाक्य निर्माण करता येतात.

उदा. 'अशोक घरात आला व तात्काळ खुर्चीत बसला आणि लगेच अभ्यासास लागला.'

बोलणारा व ती भाषा ऐकणारा एकाचवेळी उपस्थित पाहिजे असे नसते. भाषा- प्रेषक आपले विचार कागदावर लिहुन भाषा ग्रहण करणाऱ्याला संदेश पाठवु शकतो.

4) एका वाक्याचा एकच अर्थ अभिप्रेत होईलच असे नाही. बोलणाऱ्याचे म्हणणे ऐकणारा वेगळ्या अर्थाने घेउ शकतो.

5) कोणतीही मानवी भाषा हि वर्ण, आकार आणि अर्थ या तिन घटकांचे परिणामकारक असे जाळे असते यांतील प्रत्येक घटक हा आणखी वेगवेगळ्या घटकांनी युक्त असतो व त्या अंतर्गत घटकांची गुंफण देखिल अतिशय परिणामकारक असुन व्यवस्थित असते.

6) भाषा हि केवळ व्यक्तीची नसुन ती समुदायाची देखिल असते. किंबहुना एखादा व्यक्ती समुदायाची जी भाषा बोलत असेल समजत असेल तीच भाषा त्या समुदायातील प्रत्येक व्यक्तीची असते. भाषा समाजाची संस्कृती हजारो वर्षे जपुन ठेवते. भाषा ही त्या त्या समाजाच्या संस्कृतीमुळे समृद्ध होत असते भाषा आहे म्हणुन संस्कृती टिकते व संस्कृती टिकुन आहे म्हणुन भाषेचे महत्व वृद्धिंगत होते.

अशा प्रकारे भाषेचे स्वरुप व वैशिष्टे सांगता येतील

* भाषेची वाटचाल:-

मराठी भाषा ही इंडो - युरोपियन भाषाकुळातील एक भाषा आहे. मराठी भाषा ही नवव्या शतकापासुन प्रचलित असुन मराठी भाषेची निर्मिती संस्कृत-पासुन झालेल्या महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश या भाषांपासुन झाली आहे. भारतीय प्रमुख 22 भाषांपैकी मराठी एक आहे महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांची मराठी ही अधिकृत राज्यभाषा आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी हि जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे.

आद्यकाळापासुन ते आधुनिक काळापर्यंत मराठी भाषेत झालेले बदल पुढीलप्रमाणे-

ताम्रपटात तसेच शिलालेखात आढळतात.

२) यादवकाळ -

हा काळ इ.स. १२५० ते इ.स. १३५० असा आहे. देवगिरीच्या यादवांचे महाराष्ट्रावर राज्य असल्याने मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा होता. अनेक लेखक व कवी यांना राजाश्रय होता. याच काळात महानुभाव पंथाची सुरवात झाली. चक्रधर स्वामी, भावे, महिंद्र व्यास, नागदेव आणि महदंबा यांनी मराठी वाङ्मयात महत्वाची भर घातली.

३) बहामनी काळ (इ.स. १३५० ते इ.स. १६००)

यादवांचे साम्राज्य संपुन मुसलमानी आक्रमकांचा काळ. त्यांना स्थानिक लोकभाषेचे काहि कर्तव्य नव्हते. सरकारी भाषा फारसी असल्याने मराठी भाषेत 'तारिख' सारख्या अनेक शब्दांचे आगमन होउन मराठी साहित्यात भर पडली.

४) शिवाजी महाराजांचा काळ - (इ.स. १६०० ते इ.स. १७००)

या काळात मराठी स्वराज्याची स्थापना झाली. मराठी भाषेवरील फारसी शब्दांचे आक्रमण थांबवले. शिवाजी महाराजांनी रघुनाथ पंडित यास राज्यव्यवहार-कोश - फारसी ऐवजी संस्कृत शब्दयोजना करण्यास सांगितले. मराठी भाषेला राजमान्यतेसोबत संत तुकाराम, समर्थ रामदास यांच्यामुळे लोकमान्यताहि मिळु लागली.

५) पेशवे काळ (इ.स. १७०० ते इ.स. १८१८)

या काळात मोरोपंतांनी मराठी भाषेत ग्रंथरचना केल्या तसेच श्रीधर कवीने आपले हरिविजय व पांडवप्रताप या काव्या द्वारे खेड्यात आपल्या मराठी कविता पोहोचवित्या. याच काळात शृंगार व विर रसास स्वतंत्र स्थान मिळुन लावणीव पोवाडा हे नविन प्रकार मराठीत निर्माण झाले.

६) इंग्रजी कालखंड - (इ.स. १८१८ ते आजतागायत)

या काळात गद्य लेखनाची सुरवात झाली. कथा लेखनाची बीजे याच काळात रोवली. नियतकालिक व गद्यसाहित्य छापण्याची सुरवात झाली. छपाईची सुरवात झाल्यानंतर मराठी भाषेचा प्रसार उत्तरोत्तर अधिक होत गेला.

समारोप :- सर्व प्रकारे ...

# प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार

नाव :- श्रीम. शिंदे आरती रावसाहेब

रोल नं :- ८

वर्ग :- एम.ए. II ( sem- III )

# अंतर्गत मुल्यमापन परीक्षा

## विषय -: प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार

घटक १ तोंडी परिक्षा

प्रश्न १ दृक-श्राव्य माध्यमांचे स्वरुप व वैशिष्टे स्पष्ट करा

प्रश्न २ भाषेचे स्वरुप व वैशिष्टे सांगुन भाषेची वाटचाल स्पष्ट करा.

घटक २ - चर्चासत्र / सादरीकरण

विषय -: लोकशाहितील प्रसारमाध्यमांची भुमिका

घटक ३ - खुले पुस्तक परिक्षण

कोणत्याहि एका ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक साहित्याचे एका पुस्तकाचे परिक्षण तुमच्या शब्दात लिहा.

घटक ४ - लघुसंशोधन प्रकल्प

विषय : 'प्रवासवर्णन' हा एक वाङ्मयप्रकार आहे
एक तात्विक विवेचन.

घटक ५ - चर्चासत्र

विषय - दृक श्राव्य माध्यमांची आवश्यकता / गरज.

——— ×०× ——— ×०× ——— ×०×

घटक - २

# पर्यासत्र/ सादरीकरण

घटक - २


"चर्चासत्र"

विषय :- "लोकशाहीतील प्रसारमाध्यमांची भूमिका"

प्रास्ताविक

स्वातंत्र्यकालीन भारत व २१ व्या शतकातील भारत यांची तुलना करता आधुनिक भारतामध्ये सामाजिक परिवर्तन घडुन आले आहे सामाजिक परिवर्तन अतिशय आवश्यक आहे. सामाजिक जिवनामध्ये परिवर्तन गतिशिलतेचे प्रतिक मानले जाते. स्थायित्व व गतिशिलता ही सामाजिक जीवनाची वास्तविकता आहे. आणि विज्ञानामुळे दळणवळण क्षेत्रात क्रांतीकारी बदल घडुन आले आहे. संपुर्ण विश्व मध्ये एकता, संपर्क, संदेशवहनाचे कार्य प्रसारमाध्यमे करीत आहे. त्यामुळे प्रसारमाध्यमांची गरज निर्माण झाली आहे. प्रचार, प्रसार व संप्रेषणाच्या दृष्टीने महत्व अधिक आहे. समाजात एकता व संघटनेला मजबुत करण्याकरीता राष्ट्रीयतेचा विकास करण्याकरीता, मानव संसाधनांचा विकास करण्याकरीता, लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याकरीता, समाजामध्ये नियंत्रण प्रस्थापित करण्याकरीता प्रसारमाध्यमे महत्वाची भुमिका बजावत असते.

अ) आधुनिक प्रसार माध्यमे :



१) प्रिंट मिडिया :- (मुद्रण माध्यम)

मुद्रण माध्यम जनसंचाराचे सर्वात जुने माध्यम आहे. मुद्रण माध्यमामध्ये वर्तमानपत्र मॅगेझीन बुलेटीन, पुस्तक रिपोर्ट, पोस्टर इत्यादी मुख्य असतात. या सर्वामध्ये वर्तमानपत्र हे सर्वाधिक महत्वपुर्ण मानले जाते. विविध विषयांवर व्यापक सामग्री वर्तमानपत्रामध्ये असते. वर्तमानपत्रातुन कमी किंमतीमध्ये महत्वपुर्ण राजनैतिक आर्थिक, सामाजिक इत्यादी घटनाक्रमांची माहिती मिळविली जाते. साहित्यीक मनोरंजनासंबंधीची माहिती यामध्ये असते. समाजात असलेल्या कु-रितींचे, विसंगत भेदभाव अन्याय, शोषण, अत्याचार इत्यादीविषयीची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य व समाजाला स्वच्छ करण्याचे कार्य / प्रयत्न करीत असते. समाजात असलेली भेदभावनिती, बालविवाह, विधवांची दुर्दशा, दुर्बल वर्गाविरील अत्याचार इ. बद्दलची माहिती प्रसरविण्याचे कार्य मुद्रण माध्यमातुन होत असते.

२) रेडिओ (आकाशवाणी) :-

रेडिओच्या माध्यमातुन एका स्थानावरुन प्रसारीत होणारे कार्यक्रम जगाच्या अन्य भागां- नाही श्रवण करता येतात. रेडिओ दुरसंचार माध्यमाचा सर्वात सुलभ व सशक्त प्रकार आहे. गीत, संगित कहाणी, नाटक कवी संमेलन इत्यादि कार्यक्रमांद्वारे रेडिओ लोकांचे मनोरं- जन करतो. त्याचप्रमाणे जीवनाच्या विभिन्न क्षेत्राविषयीची उपयोगी माहिती रेडिओ प्रदान करीत असतो. रेडिओचे कार्यक्रम शिक्षित आणि अशिक्षित दोन्ही लोक ऐकु शकतात. रेडिओद्वारे. शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला जातो. सरकारचे कार्यक्रम व योजना जनतेपर्यंत पोहचविता येतात. अशा प्रकारे समाजजागृती व परिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणुन रेडिओची भुमिका महत्वपुर्ण आहे.

३) चलचित्र :-

चलचित्र जनसंचाराचे एक प्रभावी माध्यम आहे. चलचित्र शिक्षित, अशिक्षित दोन्ही माध्यमां करीता उपयोगी आहे चलचित्रातुन पाहणे व ऐकणे दोन्ही एकाचवेळी होत असल्याने रेडिओच्या तुलनेत अधिक प्रभावशाली आहे. चलचित्रांदवारे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकिय, सांस्कृतीक, शैक्षणिक जीवनाचे चित्रण करता येते. चलचित्राच्यादवारे कथानक संवादाच्या माध्यमातुन निर्माणकर्ता आपला संदेश लोकांपर्यंत पोहचवित असतो.

४) दुरदर्शन :-

दुरदर्शनच्या अविष्कारामुळे जनसंचारामध्ये क्रांतीकारी परिवर्तन झाले आहे दुरदर्शनचे कार्यक्रम दृक-श्राव्य माध्यमातुन बघितले जाते. टेलिव्हीजन सेट हलका व लहान असल्यामुळे एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी नेण्यास सोपा असतो. विशिष्टतेमुळे दुरदर्शन आज जनसंचाराचे प्रभावी माध्यम झाले आहे. दुरदर्शनच्या माध्यमातुन राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय बातम्या, गीत, संगित नाटक, कवी संमेलन इत्यादी मनोरंजनाचे विविध कार्यक्रम प्रक्षेपित केले जातात. याशिवाय शिक्षण, कृषी, विज्ञान, औषधी, तंत्रज्ञान संबंधी ज्ञानरंजक कार्यक्रम सामाजिक आर्थिक, राजनैतिक खेळ, जगत् इत्यादीसंबंधी महत्वपुर्ण माहिती प्रसार-प्रचार करण्याचे कार्य दुरदर्शनच्या माध्यमाने करता येते

५) संगणक तंत्रज्ञान :-

संगणक अविष्कारामुळे सूचना, माहिती तंत्रज्ञानामध्ये नवीन युगाची सुरवात झालेली आहे वेबसाईटच्या माध्यमातुन सुचना, माहिती इंटरनेटवर प्रसारीत करु शकते जगाच्या प्रत्येक कोपऱ्यावर माहिती.

माहिती संदेश पाठवु शकतो. अशा प्रकारे कमि वेळेमध्ये जगात कुठेहि संपर्क साधणे सोपे झाले आहे. अशाप्रकारे संगणक हे जनसंचाराचे एक महत्वपुर्ण माध्यम आहे.

## व] समाज परिवर्तनशिलतेमध्ये प्रसारमाध्यमांची भुमिका :

समाजामध्ये आधुनिकता निर्माण करण्याकरीता प्रसारमाध्यमे महत्वाची भुमिका बजावित असते. समाजाला नविन दिशा विचार देण्याचे कार्य करीत असते. शिक्षण प्रणालीला प्रवाहित व नवी दिशा देण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करीत आहे. लोकांमध्ये परिवर्तनाची भावना निर्माण झाली पाहिजे समाज परिवर्तनामध्ये वर्तमानपत्र, चित्रपट दुरदर्शन इ. प्रसारमाध्यमे महत्वाची भुमिका निभावित असते प्रसार-माध्यमे लोकांमध्ये परिवर्तनाची भावना निर्माण होत असते. पर्यावरण सुरक्षा, सामुदायिक स्वास्थ्य, चिकित्सा सुविधा तसेच सुरक्षा सेविबाबत विस्तारपुर्वक जाणिवजागृती निर्माण करण्याचे कार्य प्रसारमाध्यमांदवारे माध्यमांतुन पुर्ण होत आहे. सामाजिक जीवनामध्ये ज्या क्षेत्रांमध्ये परिवर्तन आणायचे आहे, तसेच ज्या लोकांच्या समस्यांचे निराकरण करायचे आहे, ज्या लोकांच्या विकासाकरता काम करायचे आहे, त्यांच्याप्रती सहानुभुती निर्माण करण्याकरता प्रसारमाध्यमे महत्वाची भुमिका पार पाडतात.

## 9) अनौपचारिक शिक्षणाचे माध्यम :

प्रसारमाध्यमे ही अनौपचारीक शिक्षणाची महत्वाची साधने आहेत. या प्रसारमाध्य-मातुन सर्वसामान्य जनतेपर्यंत मनोरंजनाच्या कार्यक्रमाबरोबर समाजप्रबोधनाचे कार्यक्रमही पोहचविता येतात. बातम्या, व्याख्याने आणि सुगम संगित, शास्त्रीय संगित, सिनेसंगित नाट्यगायन, मृतिका, कामगार आणि शेतकरी वर्गासाठी कार्यक्रम-

अनौपचारिक शिक्षण या प्रसारमाध्यमांद्वारे दिले जातात.

२) लोकशिक्षणाचे / जनजागृतीचे प्रभावी माध्यमे :-

प्रसारमाध्यमे ही मनोरंजनावरोबरच जनजागृती किंवा लोकशिक्षणाचे एक प्रभावी साधन आहे. आकाशवाणी व दुरदर्शन हे करमणुकीचे सुलभ साधन आहे. चांगल्या प्रकारचे संस्कार मुलांवर घडून आणण्यासाठी बालवयापासुन आकाशवाणी व दुरदर्शनवरील प्रबोधनात्मक कार्यक्रम पाहण्याची व ऐकण्याची सवय लावणे आवश्यक आहे. ही साधने फक्त मनोरंजनाची साधने नसून प्रबोधन व शिक्षणाची साधने आहेत.

३) राष्ट्रीय जनजागृतीचे माध्यम :-

विद्यार्थी वर्गात राष्ट्रवादी भावनेचा विकास व्हावा. हे शिक्षणाचे ध्येय आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना रुजविण्याचा, त्याला खतपाणी घालण्याचा प्रयत्न करीत असते. ज्या ठिकाणी शिक्षक अपुरा पडतो, त्याठिकाणी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रवादाची भावना वृद्धींगत करण्याचे कार्य ही प्रसारमाध्यमे करु शकतात. स्वातंत्र्य चळवळीचा इति इतिहास मालिकांच्या रुपात दाखविणे अशा कार्यक्रमातुन युवकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना विकसित करता येते.

उदा. अलिकडेच झी मराठी वाहिनीने 'वीर संभाजी' ही मालिका दाखवून मराठा साम्राज्यासाठी प्राणांचे बलिदान देणारे किती लढवय्ये होते, याची माहिती अतिशय उद्बोधक अशा स्वरुपात दाखविली आहे.

थोडक्यात शिक्षणाचा प्रसार, सामाजिक प्रबोधन, सामाजिक परिवर्तन, राष्ट्रवादाची भावना विकसित करणे अशा विविध मार्गांनी या प्रसारमाध्यमांचा उपयोग करुन घेता येईल.

क) प्रसारमाध्यमांचे समाजातील महत्व :-

प्रसारमाध्यमे देशाच्या सर्वांगिण विकासात महत्वाची भुमिका पार पाडतात.

1) महत्वाची बातमी प्रसारित करण्यासाठी आवश्यक :-

प्रसारमाध्यमांचा वापर हा सार्वजनिक किंवा महत्वपुर्ण घटकांच्या प्रसारासाठी केला जातो. जे आपल्या दैनंदिन जीवनासाठी महत्वाचे असतात. हि प्रसारमाध्यमे देशाच्या सर्वांगिण विकासात महत्वाची भुमिका पार पाडतात

२) विवादग्रस्त घटनेचे स्पष्टीकरण :-

समाजामध्ये घडणाऱ्या घटनांचे मुल्यमापन किंवा योग्य विश्लेषण देण्यासाठी प्रसारमाध्यमे महत्वाचे आहे.

3) सामाजिक शिक्षण :-

शैक्षणिक प्रक्रिया सुधारण्यासाठी प्रसारमाध्यमांचा वापर केला जातो. उदा. सामाजिकीकरण सामान्य शिक्षण शाळेतील शिक्षण इ. प्रमाणे सामाजिक व सांस्कृतिक परंपरा विकसित करण्यासाठी प्रसारमाध्यमे महत्वाचे कार्य करतात.

4) सार्वजनिक संबंध वाढविण्यासाठी :-

प्रसारमाध्यमे हे सार्वजनिक संबंध प्रस्थापित करण्याचे एक महत्वाचे साधन म्हणुन कार्य करते. सरकार व्यवसाय आणि व्यक्ती हे प्रसारमाध्यमांद्वारे आपले संबंध करण्याचा प्रयत्न करतात.

5) जाहिरातीचे महत्वाचे साधन :-

आर्थिक व्यवस्थेमध्ये विज्ञान प्रक्रियेमध्ये प्रसारमाध्यमाचा एक महत्वाचा

साधन म्हणुन उपयोग होतो. जाहिरातीच्या माध्यमातुन जनतेस नविन उत्पादनविषयी व त्यांच्या किमतीविषयी माहिती देवुन त्या खरेदी करण्यासाठी त्यांना प्रवृत्त करतात.

6) मनोरंजन :-

प्रसारमाध्यम हे लोकांसाठी एक मनोरंजनाचे एक साधन म्हणुन कार्य करते. याचबरोबर प्रसारमाध्यमे समाजाचे मनोरंजन करता करता लोकांना समाजातील विविध घटनांविषयी माहिती देते. त्याविषयी स्पष्टीकरण देते.

समारोप :-

समाज परिवर्तनामध्ये आधुनिक काळात विविध प्रसारमाध्यमांचे विविध भुमिका आहे हे लक्षात येते. सामाजिक परिवर्तन हि काळाची गरज आहे. यासाठि या माध्यमांचा वापर करुन सामाजिक परिवर्तन घडवुन आणला येते.

xox ——— xox ——— xox ——— xox ——— xox ——— xox

घटक - ३

# स्थूल पुस्तक परिक्षण

घटक - ३

## खुले पुस्तक परिक्षण

पुस्तक परिक्षण करताना अनेक घटकांचा समावेश होतो तो पुढिलप्रमाणे .

पुस्तकाचे नाव -: प्रसारमाध्यमे आणि मराठी भा

लेखक / संपादक -: डॉ भास्कर शेळके

प्रकाशन -: स्नेहवर्धन प्रकाशन

पानांची संख्या -: 316

बांधणी -: पेपरबॅक

भाषा -: मराठी .

वजन -: 334 gm.

साहित्य / पुस्तकाचा प्रकार -: कथासंग्रह

ISBN13 -: 9788189634933

किंमत -: 300 रु .

मुखपृष्ठ -: मुखपृष्ठ हे रंगित असुन त्यावर वर्तमानपत्राचे . (केसरी, पुढारी, नवाकाळ सकाळ, सामना) यांचे चित्र आहे त्याचप्रमाणे रेडीओ, स्पीकर, टिव्ही आणि रिमोट यांचे चित्र रेखाटलेले आहे . टिव्हीवरती ~~Z~~ बे मराठी वाहिनीचे चिन्ह दिसुन येत आहे

अलिकडील काळात प्रसारमाध्यमांचे स्वरुप बदललेले आहे. मुद्रित. इलेक्ट्रॉनिक, ऑनलाईन माध्यमामुळे हे जग अधिक स्पर्धात्मक आणि गतिमान झाले आहे, माध्यमानुसार मराठी भाषेतही फरक होत आहे. कशी आहे ही भाषा, याच प्रश्नाचा शोध घेण्याचा प्रयत्न डॉ. भास्कर शेळके यांनी संपादन केलेल्या या पुस्तकात आहे.

वृत्तपत्रे, आकाशवाणी, वृत्तवाहिन्या, जाहिराती आदिसंबंधात केलेल्या विस्तृत अभ्यासातुन लिहिलेल्या लेखांचा या पुस्तकात समावेश आहे. डॉ. मनोहर जाधव, महावीर जोंधळे, शिवाजी शिंदे, प्रा. दिलिप कसबे, डॉ. भरत देशमुख. प्रा. मंगल डोंगरे, प्रा. पंकज वानखेडे. आदींच्या लेखाचा या पुस्तकात समावेश आहे.

भाषांतर, रुपांतर, अनुवाद, लेखन, कौशल्य, नोकरीच्या संधी या मुद्दयांवरती पुस्तकात भाष्य करण्यात आले आहे.

एकंदरीत बदलत्या काळात व प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरुप अशा या माध्यमानुसार मराठी भाषेतही बदल होत आहे, तसेच प्रसारमाध्यमांचा मराठी साहित्यावर कसा परिणाम होतो. याचे सविस्तर वर्णन या पुस्तकात केलेले आहे.

मला हे पुस्तक परिक्षण करताना छान वाटले, विषयास अनुसरुन मुखपृष्ठाची रचना चांगली आहे.

असे हे आजच्या धकाधकीच्या जीवनात मराठी भाषा व साहित्य यांवर होणाऱ्या प्रसारमाध्यमांच्या परिणामांची माहिती देणारे. पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल स्नेहवर्धन प्रकाशनचे आभार.

आरती शिंदे

१५/१०/२०१९

घटक-४

# लघुशोध निबंध प्रकल्प

घटक - 4

# मधुसंशोधन प्रकल्प

विषय :- 'प्रवासवर्णन हा एक वाङ्मयप्रकार आहे' — एक तात्त्विक विवेचन.

⇒ प्रास्ताविक :-

प्रवासवर्णन हा अर्वाचीन काळातला महत्त्वाचा वाङ्मयप्रकार आहे. प्रवासवर्णनात 'प्रवास' हा केंद्रिभूत घटक असतो. भारतीय संस्कृतीत पूर्वीपासून जरी प्रवासवर्णने लिहिलेली असली तरी त्यांना प्रवासवर्णन म्हणून स्थान नव्हते एखाद्या स्थळाचे वर्णन करणे एवढ्यापुरतेच ते प्रवासवर्णन मर्यादित होते. प्रवासवर्णनाला कलापूर्णता लाभली ती अर्वाचिन कालखंडात 'प्रवासवर्णन' हा नपुसकलिंगी शब्द. प्रवास + वर्णन या दोन शब्दांचा मिळून झालेला जोडशब्द आहे. यापैकी 'प्रवास' हा शब्द पुल्लिंगी सामान्यनाम असुन तो 'प्र + वस' अशा मुळ संस्कृत धातुवरुन साधित झालेला आहे. 'प्र' म्हणजे दूर'. 'वस' हा धातु 'राहणे' असा अर्थ व्यक्त करतो. वस या संस्कृत धातुवरुन 'वास' हे नाम सिद्ध झाले आहे. म्हणजे प्रवास या मुळ शब्दाचा अर्थ 'दूर राहणे' असा होतो.

यावरुन आपल्याला असे म्हणता येईल की, परदेश संचार करुन किंवा परदेशात राहुन किंवा स्वदेश सोडुन अन्यत्र गेल्यावर त्याचे वर्णन ध्यात येत असेल ते खऱ्या अर्थाने प्रवासवर्णन होउ शकते.

प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकाराचे तात्त्विक विवेचन करीत असताना पुढिल मुद्दयांचा विचार करावा लागतो.

अ) व्याख्या :-

1) "प्रवासवर्णन म्हणजे प्रवासात पाहिलेल्या किंवा


घडलेल्या गोष्टींचा वृत्तांत होय."
२) "प्रवासवर्णन म्हणजे प्रवासपर सचित्र भाषण अगर व्याख्यान होय."
३) "प्रवासी, प्रवास व प्रदेश या घटकांनी साकार होणारे लालित्यपूर्ण लेखन म्हणजे प्रवासवर्णन होय."

'प्रवासवर्णन' या रूढ शब्दप्रयोगात 'प्रवासवृत्त', 'प्रवास चित्रणात्मक लेखन', प्रवासचित्रण, प्रवासलेखन हे अर्थ सामावलेले आहेत.

ब) प्रवासवर्णनाचे स्वरूप :-

'प्रवासवर्णन' या शब्दप्रयोगाबाबत 'प्रवासवृत्त' आणि 'प्रवासवर्णन' हे शब्दप्रयोग बहुतांशी रूढ असलेले आहेत. 'प्रवास चित्रणात्मक लेखन' हा शब्दप्रयोग वा.ल.कुलकर्णी यांच्या 'वाटचाल' या प्रस्तावनेत येतो. 'प्रवासलेखन' हा शब्दप्रयोग श.भि. जोशी यांच्या 'मजल-दरमजल' च्या प्रस्तावनेत येतो. 'प्रवास-चित्रण' हा शब्दप्रयोग श्री काशिनाथ पोतदार यांनी केला आहे.

क) प्रवासवर्णनातील मुलभूत घटक :



'प्रवासवर्णन' मुलतः त्या अनेक घटकांनी साकारले, त्यापैकी पहिला आणि महत्वाचा घटक म्हणजे प्रवासी हा होय. दुसरा घटक प्रवास आणि तिसरा घटक प्रदेश. या प्रवाशाने सर्वसामान्यपणे कोणत्याही प्रदेशाचा प्रवास सुरु केल्यावर त्याबद्दल तो काही बोलला अगर त्याने काही लिहिले तरच प्रवासवर्णनाला अस्तित्व असते. प्रवासवर्णनात लालित्याला महत्व असते. लालित्य म्हणजे कलापुर्ण सौंदर्य होय.

१) प्रवासी : घटक तत्व :-

या दृष्टीने विचार करताना प्रवासवर्णन व प्रवासी हे अविभाज्य घटक आहे. प्रवासवर्णनात प्रवासी नसेल तर प्रवासवर्णनाला 'प्रवासवर्णन' म्हणून अस्तित्व असणे शक्य नाही, ही गोष्ट निर्विवाद आहे. कारण प्रवास करणारा कोणी प्रवासी असल्याशिवाय प्रवास घडणार नाही आणि या प्रवासाबद्दल त्या प्रवाशाने काही लिहिले नाही किंवा तो बोलला नाही तर 'प्रवासवर्णन' साकारणे शक्य नाही. हा प्रवास त्या लेखकाचा स्वतःचा प्रवास असतो. त्याबद्दल त्याला जो बरा वाईट अनुभव आला असेल, तो त्याचा स्वतःचा अनुभव असतो. प्रत्येक प्रवाशाला एकसारखा प्रवास आणि तसाच एकसारखा अनुभव येईलच असे नाही. ती त्याची त्यावेळची एक वैयक्तिक बाब असते. तो अनुभव त्याने स्वतः व्यक्त केला की आपोआपच त्यावेळच्या प्रवासातील त्याचे स्वतःचे अनुभवविश्व निर्माण होते. प्रवासवर्णनात लेखक स्वतः बोलत असतो. लेखक जेव्हा लिहितो तेव्हा त्याचे व त्या प्रदेशाचे कलात्मक दर्शन तो घडवीत असतो.

प्रवासवर्णनात जो 'मी' व्यक्त होत असतो, तो दोन प्रकारचा मी असतो. एक लौकिक पातळीवरचा 'मी' आणि दुसरा कलात्मक पातळीवरचा मी. प्रवासवर्णनात जसा प्रवासी व्यक्त होतो तसा त्या प्रवासातील कलावंतही व्यक्त होतो. हा कलावंत व लेखक म्हणून जो कोणी 'मी' व्यक्त होतो, तो वेगळा 'मी' असतो. तो अपरिहार्यपणे व्यक्त

राहतो किंवा राहतही नाही. श्रेष्ठ दर्जाची प्रतिभाशक्ती लेखकापाशी असल्याशिवाय शक्य नसते. या विवेचनावरुन असे म्हणता येते की प्रवास व प्रवासी हे प्रवासवर्णनाचे अविभाज्य घटक आहेत.

२) प्रवास : घटक तत्व :-

'प्रवासी' या प्रवासवर्णनाचे घटक तत्वाचे स्वरुप पाहिल्यावर आपल्याला 'प्रवास' व 'प्रदेश' या घटकांकडे वळावे लागते. त्यापैकी प्रवासतत्व हे प्रवासवर्णनाचे केंद्रिभुत घटक तत्व मानावे लागते. ते प्रवासी आणि प्रदेश या दोन घटकांना जोडणारे दुव्यासारखे तत्व आहे. असे म्हणता येईल. 'प्रवासी' हे नामाभिदान प्रवासवर्णनाच्या लेखकाला प्रवास केल्यानेच प्राप्त होते. प्रवासवर्णनाचा लेखक हा नुसता लेखक नसतो, तर तो प्रवासी लेखक असतो त्याने प्रत्यक्ष प्रवास करुनच प्रवासवर्णन लिहायचे असते. 'प्रवास' नसेल तर प्रवासवर्णन कशाचे करायचे? 'प्रवासवर्णन' या संज्ञेतील 'प्रवास' हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. कारण ते त्या विशिष्ट प्रवासाचे केलेले वर्णन आहे. प्रवास वर्णनात जे चित्र येते, त्या चित्राची रखुमारी प्रवास या घटकामुळेच निर्माण होत असते. कारण लेखक प्रवाशाची भुमिका करीत असल्याने त्या प्रवासात त्याच्या व्यक्तिमत्वाचे रंग अधिक खुलुन दिसतात दैनंदिन जीवनाच्या चाकोरीतुन प्रवासात असल्याने मनावरील एक प्रकारचा ताण दुर सारला जातो. प्रवासातील नव्या संस्कारांनी प्रवासी लेखकाच्या मनाचे कोने-कोपरे ताजे, टवटवीत होऊन उजळुन निघतात.

'प्रवास' या घटक तत्वामुळेच स्थळवर्णनाहुन व इतर वांङमयप्रकाराहुन प्रवासवर्णन वेगळे ठरत असते. 'प्रवास' ही मानवी जीवनाची एक मुलभुत प्रक्रिया आहे अशा प्रवासातील अनुभुतीचा कलात्मक अविष्कार प्रवासवर्णनात घडणे महत्वाचे असते.

३) प्रदेश : घटक तत्व :-

'प्रवास' च्या घटकतत्वाबरोबरच अत्यंत महत्वाचे तिसरे तत्व म्हणजे प्रवासवर्णनास आकार करत असते ते 'प्रदेश तत्व होय. 'प्रवास' आणि 'प्रदेश' मग तो कोणताही असो; प्रवासवर्णनात अपरिहार्यपणे अवतरत असते. कोणताही 'प्रदेश' याचा अर्थ स्वदेशातील प्रदेश, परदेशातील प्रदेश अगर अंतराळातील प्रदेश असाही होतो. प्रदेश शब्दाची व्याप्ती मोठी आहे. प्रवासवर्णनात व्यक्त होणारा प्रदेश म्हणजे केवळ 'स्थळ' नाही तर ते स्थळ त्या व्यक्त प्रदेशाचा घटक असते. प्रदेश म्हटल्याबरोबर त्याचा भुगोल, इतिहास, धर्म, कला, तिथला निसर्ग तिथले वातावरण व स्तर गोचर व अगोचर होणाऱ्या गोष्टी, तसेच त्या-त्या प्रदेशाची खास वैशिष्टे यात अभिव्यक्त होऊ शकतात.

प्रवासवर्णनात जो प्रदेश व्यक्त होतो तो प्रदेश भौगोलिक वैशिष्ट्य व मर्यादांनी युक्त असतो तो प्रदेश भौगोलिक वैशिष्ट्य व मर्यादांनी युक्त असा केवळ प्रदेश नसतो किंवा 'स्थळ' ही नसते. तर एका विशिष्ट प्रवासी लेखकाला एका विशिष्ट रितीने जाणवलेला एक चालता बोलता चैतन्यशिल माणसासारखा विशिष्ट व्यक्तिमत्व लाभलेला भुप्रदेश होय.

समारोप :-

'प्रवासवर्णन' हा एक ललितवाङ्मय प्रकार आहे. प्रवासवर्णनात 'प्रवास' हा घटक केंद्रिभुत असतो. कारण प्रवास झाल्यामुळेच वर्णनाला महत्व प्राप्त होते. पण केलेले वर्णन नुसते माहितीपुर्ण नसावे. त्याला ललित्याची जोड असावी लागते. म्हणुनच प्रवासवर्णनाचा तात्त्विक विचार करताना तात्विक घटक, प्रवास, प्रवासी व प्रदेश यांचा विचार महत्वाचा ठरतो.

---×०×---×०×---×०×---×०×---

घटक-५

# गटचर्चा

# घटक ५

## गटचर्चा

विषय :- दृक् श्राव्य माध्यमांची आवश्यकता / गरज

संप्रेषण हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. दैनंदिन जीवन जगताना मानवाला समाजाशिवाय जगणे शक्यच नसते. त्यांच्या गरजा भागविण्यासाठी तो सहकाऱ्यांशी नेहमी काहीतरी बोलत असतो, ऐकत असतो, पाहत असतो. दैनंदिन जीवनातील अनुभव कथन करत असतो. यात ध्वनी हे संप्रेषणाचे महत्त्वाचे साधन आहे. आदिम काळापासुन ध्वनीच्या माध्यमातुन आपण संवाद साधतो. ध्वनीतुन पुढे शब्द निर्माण झाले. शब्दातुन भाषा विकसीत झाल्या, त्यातुन भाषेचे शास्त्र विकसित झाले. भाषा, समाज आणि संस्कृतीच्या जडण-घडणीत प्रसारमाध्यमांनी महत्वाचे योगदान दिले. दृक-श्राव्य माध्यमे लोकांच्या पसंतीस उतरली मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनली. सकाळी उठल्यापासुन ते झोपेपर्यंत माणसांचा वेगवेगळ्या प्रकारे त्यांच्याशी संबंध येतो यासाठीच त्यांची आवश्यकता भासते. दृक-श्राव्य माध्यमांची आवश्यकता का भासते याविषयीची चर्चा प्रथमेश, वेदिका, पुजा, प्रणव यांनी केलेली आहे. ती चर्चा खालील प्रमाणे,

प्रथमेश :- दृक- श्राव्य माध्यम विविध कारणांमुळे लोकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे. लोकांना एखाद्या गोष्टीची त्वरीत माहिती मिळविण्यासाठी यांचे महत्व आहे.

वेदिका :- संप्रेषण हा मानवी जीवनाचा घटक आहे आणि हा घटक सतत टिकुन ठेवण्यासाठी दृक श्राव्य माध्यमांची गरज भासते.

पुजा :- दृक श्राव्य माध्यमे एकाचवेळी लाखो प्रेक्षकांशी संपर्क साधु शकतात. एखादी घटना किंवा वृत्त दृक-श्राव्य माध्यमांद्वारे ती घटना सर्वापर्यंत पोहचते. ही कला अन्य माध्यमे त्वरीत करु शकत नाही

पुजा :- दृक श्राव्य माध्यमातुन समाज-प्रबोधनाचे कार्य केले जाते. एखादी मोठी समस्या आहे आणि त्याबद्दल काही गैरसमज समाजात पसरलेले असतात. अशावेळी लोकप्रबोधनाचे कार्य उत्तमप्रकारे ही माध्यमे करु शकतात.

प्रणव :- समाजात वेगवेगळ्या क्षेत्रातील माणसे असतात. त्यांचा वेगवेगळ्या विषयावर अभ्यास आहे. वेळोवेळी ते आपले विचार व्यक्त करतात. त्यांनी असे व्यक्त केलेले विचार समाजाला हितकारक असतात. दृक-श्राव्य माध्यमातुन या विचारांचा प्रसार व प्रचार होतो.

प्रथमेश :- दृक-श्राव्य माध्यमातुन जन-सामान्यांना लोक-शिक्षण देण्याचे कार्य केले जाते. समजा, H.N. या रोगाबाबत जणसामान्य माणसांना काहीच माहिती नाही. हा रोग कशामुळे आणि का होतो? याची कारणे कोणती? त्यावेळी प्रसारमाध्यमे व्यवस्थीत माहिती सांगतात. पोलिओचा डोस ५ वर्षाच्या आतील मुलांना ज्यावेळेस देणार आहे त्यासाठी प्रसारमाध्यमे वारंवार तेच वृत्त दाखवितात.

वेदिका :- आजच्या काळात नेहमी नविन शोध लागत आहे वेगवेगळी नविन उत्पादने तयार होत आहे. आणि आपण अशा प्रकारचे उत्पादन तयार केले आहे ते समाजापर्यंत गेले पाहिजे. त्याची माहिती त्यांना समजली पाहिजे. याविषयीच्या जाहिराती दृक-श्राव्य माध्यमाद्वारे समाजापर्यंत पोहोचतात.

पुजा :- विविध समस्यांचे निराकरण चालल्या घडामोडी सांगण्यासाठी शासकिय योजनांची माहिती देण्यासाठी हे उपयुक्त आहेत.

प्रणव :- हवामानाचा अंदाज, बाजारभाव, रंजनात्मक कार्यक्रम दाखवण्यासाठी सुद्धा दृक-श्राव्य माध्यमाची आवश्यकता आहे.